# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २३/०९/२०२४ (सोमवार) दुपार**

---

### बेला पोलीस यांची कोंबडा बाजार वर कार्यवाही

बेला पोलीस यांना मौजा पोही शेतशिवारात काही ईसम कोंबडयाच्या झुंज व त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळीत आहे. अशी गुप्त माहीती मिळाली. मिळालेल्या माहीतीनुसार त्या ठीकाणी लपछपत गेले असता मौजा पोही शेतशिवारात काही ईसम कोंबडयांची झुंज लावुन त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा खेळ खेळीत असताना दिसुन आल्याने त्यांचेवर जुगार कायदांअंतर्गत रेड केला असता पोलीसांना पाहून काही ईसम पळुन गेले व खालील नमुद ईसम मिळुन आल्याने त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव १) विलास बबन पारसे, वय ४१ वर्ष रा. सातगांव ता. हिंगणा जि. नागपुर २) विजय शामराव मोरसकर, वय ४० वर्ष रा. सिंधी रेल्वे ता. सेलु जि. नागपुर ३) कैलास मेघश्याम नागपुर, वय ३७ वर्ष रा. सातगांव ता. हिंगणा जि. नागपुर ४) रत्नाकर नानाजी घोडे, ५५ वर्ष रा. मनीराम थड पोस्ट सिंधखेड ५) कवडु गोपाळराव सोनोने, वय ५५ वर्ष रा. चारगांव ता. उमरेड जि. नागपुर ६) अमित सुरेश वाघाड, वय २८ वर्ष रा. पोही जि. नागपूर असे सांगितले नमुद ईसमाची अंगझडती घेतली तसेच घटनास्थळाची झडती घेतली असता त्यात आरोपी क्रमांक ०१, ०२ व ०५ कडुन एकुण २३४०/— रू. रक्कम, २ कोंबडे त्यापैकी एक कोबडयाच्या पायांना काथ्या बांधुन एक कोंबडा जखमी अवस्थेत मिळुन आला लाल रंगाचा , दुसरा पांढरा कथा  रंगाचा असलेला  सदर कोंबडयाची झुंज व पैशाजी बाजी लावुन जुगाराचा हारजीतचा खेळ खेळताना मिळालेल्या दोन कोंबडयाची किंमत अंदाजे १०००/—रू. ५) एक कोंबडयाच्या पायांना बांधलेला काथ्या लोखंडी धातुचा धारधार असलेल्या प्रती नग २०/—  प्रमाणे किमंत २०/— रूपये ६) घटनास्थळावरून मिळालेले ३० नग कात्या प्रतेकी किंमत अंदाजे २० रू प्रमाणे ६०० रूपये ७) आरोपी क्र ०३ कडुन रेडमी कंपनीचा १०,००० रू किंमतीचा मोबाईल असा एकुण  २५,९६० रूपयाचा माल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री रमेश धुमाळ, मा. सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय अधिकारी श्री दिपक अग्रवाल सा. (भा.पो.से) यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री सी. बी. चौहान, पोउपनि खंडेराव बोळगीर, पोउपनि संतोष चव्हाण, पोशी ओम राठोड, पोशी श्रीधर कुलकर्णी यांनी केली आहे.

## पो.स्टे. मौदा हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक २२/०९/२०२४ रोजी पोस्टे मौदा येथील स्टाफ पोस्टे हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, पोलीस स्टेशन मौदा हद्दीतील वडोदा येथील बाजार चौकात मोकळया जागेत काही इसम ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पोस्टे मौदा येथील स्टाफ यांना प्राप्त झाले वरून सदर स्टाफ वडोदा बाजार चौकात सापळा रचुन छापा टाकला असता **आरोपी नामे— १) पंकज उर्फ बंटी कवडूजी तुमाने, वय ३५ वर्ष रा. वडोदा ता . कामठी जि. नागपूर २) अतुल सोपान बावणे वय ३४ वर्ष, रा. वडोदा ता. कामठी जि. नागपूर ३) शुभम अशोक मोरे वय २० वर्ष, रा. वडोदा ता कामठी जि. नागपूर ४) प्रतिक गणेश कावळे वय २२ वर्ष, रा. वडोदा ता. कामठी जि. नागपूर ५) गंगाधर धनराज धांडे वय ४८ वर्ष रा. तारसा जि. नागपूर** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०५ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन ओपो कंपनीचा ॲन्डराईड मोबाईल फोन किंमती ७०००/— रूपये रेडमी कंपनीचा मोबाईल किंमती ५०००/— रूपये नगदी १७५०/रूपये असा एकुण १३,७५०/— रूपयाचा मुद्येमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे मौदा येथे कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे मौदा येथील ठाणेदार पोनि प्रमोद घोंगे, पोउपनि अरविंदकुमार जगने, पोहवा हरीश यंगलवार यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर